# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/म.व्य(भूमी)/ C96180 दिनांक : 11 | 11 | २०२०

## परिपत्रक

विषय:- कोरोना विषाणूंचा(Covid-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता **उद्योजकांना विविध शुल्क भरण्याकरीता विलंबशुल्क न आकारता कालावधी वाढविणे तसेच विनाशुल्क मुदतवाढ मंजूर करणेबाबत व इतर बाबींबाबत..**

संदर्भ :-१) परिपत्रक क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/B ५०८४९ दिनांक ०१.०७.२०२०
२) परिपत्रक क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/सी६९५९३ दिनांक २२.१०.२०२०

कोरोना विषाणूंचा(Covid-१९) चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेता उद्योजकांना विविध शुल्क भरण्याकरीता विलंब शुल्क विलंबशुल्क न आकारता कालवधी वाढविणे तसेच विनाशुल्क मुदतवाढ करणेबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या दिनांक १६.१०.२०२० रोजी झालेल्या ३८७ व्या बैठकीत चर्चा होवून प्रकरणी प्रकरणी प्राप्त निर्देशानुसार उपरोक्त संदर्भिय क्र. २ नुसार परिपत्रक निर्गमित केलेले आहे.

सदरहू परिपत्रातील अ.क्र. ३ नुसार ज्या भूखंडांचा विकास कालावधी/वाढीव विकास कालावधी दिनांक ३०.०६.२०२० नंतर संपलेला आहे अशा भूखंडांचा विकास कालावधी दिनांक ०१.०७.२०२० ते ३१.१२.२०२० पर्यन्त वाढविण्याबाबतचे अधिकार संदर्भिय परिपत्रक्र क्र. २ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. तथापि प्रकरणांची संख्या व्यापक असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेले अधिकाराचे विकेंद्रिकरण करुन दिनांक २६.०९.२०१६ च्या परिपत्रकानुसार औद्योगिक, व्यापारी, निवासी, प्राधान्य सदराखालील भूखंड वाटपाच्या/हस्तांतरणाच्या अधिकारानुसार संबंधित प्रादेशिक अधिकारी/उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

संदर्भिय परिपत्रकामध्ये इतर कोणताही बदल करणेत आलेला नाही.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in